# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
# ग प्रभाग कार्यालय
# कार्यपत्रिका क्रमांक - २
# सभावृत्तांत

दिनांक - १८/६/२०१९ वेळ - सकाळी ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दि.१८/६/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.बारणे अर्चना तानाजी – सभापती
२. मा.पवार मनिषा प्रमोद
३. मा.अभिषेक गोविंद बारणे
४. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
५. मा.निलेश हिरामण बारणे
६. मा.सविता बाळकृष्ण खुळे
७. मा.संदिप काशिनाथ गाडे - स्विकृत सदस्य
८. मा.विनोद हनुमंत तापकीर - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्रीमती स्मिता झगडे – सहा.आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी, श्री.कोळप एस डी – प्रशासन अधिकारी श्री.व्ही.एम.गायकवाड – मुख्य लिपिक, श्रीमती अमृता लागु - लेखाधिकारी, श्री.अघाव – कार्यालय अधिक्षक, श्री.एस.डी.निंबाळकर – आरोग्य निरीक्षक, श्री.देवन्ना गट्टुवार – कार्यकारी अभियंता (स्थापत्य), श्री.अतुल जोशी – कनिष्ठ अभियंता स्थापत्य, श्री.बाबासाहेब गलबले - कार्यकारी अभियंता,विद्युत, श्री.मोने उमेश – उपअभियंता,जलनि:सारण, श्री.बोरसे एम डी, श्री.रोकडे जयवंत, श्रीमती गोखले एस एन – कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा श्री सतिष तायडे– कनिष्ठ अभियंता,विद्युत, श्री.पी.पी.पाटील – कार्यकारी अभियंता, जलनि:सारण, श्री.बंडगर एस बी – कनिष्ठ अभियंता,जलनि:सारण, श्रीम.सानप ए.व्ही, श्री.कोरेवार, श्री.गजपुरे व्ही पी, कलाल आय के – कनिष्ठ अभियंता,स्थापत्य, श्री.जे व्ही पटेल – सहाय्यक उद्यान अधिक्षक, श्री.कदम सी.टी – मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, थेरगाव इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत आली.

मा.अर्चनाताई बारणे यांची ग प्रभाग समितीचे सभापती पदी निवड झाल्याने ग प्रभाग समिती तर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले.

१) दि. ५/३/२०१९ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र. १३ ) कायम करणेत येत आहे.

२) दि.९/५/२०१९ (मा.सभापती निवड) विशेष सभेचा सभावृत्तांत (कार्यक्रम पत्रिका क्र.१) कायम करणेत येत आहे.

सदर सभे दरम्यान मा.नगरसदस्यांनी पावसाळयापुर्वीचे नियोजनाविषयी विचारणा केली असता, मा.प्रभाग अधिकारी यांनी मागील पावसाळयात आलेल्या अडचणी विचारात घेता यावर्षी पावसाळयापुर्वीचे आवश्यक ते कामकाज करणेत आलेले असल्याचे सांगितले. तसेच यांसदर्भात काही भागांमध्ये दोन वेळा कार्यवाही करणेत आलेली असुन २४ तास आपत्ती विभाग कार्यरत आहे असे सांगण्यात आले.

प्रभागात सुरु असलेल्या ड्रेनेजच्या कामांमुळे तसेच अमृत योजनेच्या कामांमुळे रस्त्यांवर पडलेला राडारोडा पावसाळयापुर्वी लवकरात लवकर उचलण्यात यावा अशी सुचना देण्यात आली.

याव्यतिरीक्त ग क्षेत्रिय कार्यालयातील आरोग्य विभागाने आठही प्रभागामध्ये प्रशासकीय शुल्क वसुली व प्लास्टीक बंदी दंड वसुली यासंदर्भात उत्तम कामगिरी केल्यामुळे मा. प्रभाग समिती तर्फे आरोग्य विभागाचा सत्कार करण्यात आला.

सदर बैठकीदरम्यान नेमुन देण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा पुढील बैठकीमध्ये घेण्यात येईल असे सांगुन सर्वांचे आभार मानुन मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(समितीसमोर आलेले ऐनवेळेचे विषय पुढील मासिक समिती सभेमध्ये दाखल करुन घेणेत येतील.)

**अध्यक्ष**
**ग प्रभाग समिती**
**थेरगाव– ३३.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/ /२०१९
दिनांक - २६/०६/२०१९

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
**क्षेत्रीय कार्यालय,**
**थेरगाव – ३३**

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या ठरावानुसार नियमाधीन कार्यवाही करणेत यावी, यासंदर्भात वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही.